**: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७/२०२४ मधील नि. ४० खालील आदेश –:**

(दिपा चंद्रशेखर जाधव व.४ विरुध्द सुकी डेव्हलपर्स देवाकी रॉयल व.६)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारसांची नावे अभिलेखावर सामील करुन त्याप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केला आहे.

०२. वादीचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र. ४ हे दिनांक १०/११/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदरहु मयतास प्रतिवादी क्र. ४अ. ओमकार सुभाष रजपूत, प्रतिवादी क्र. ४ब. कविता गजेंद्र पांढरे, प्रतिवादी क्र. ४क. श्रध्दा सुभाष रजपूत असे वारस आहेत. सदर कामी प्रतिवादी क्र. ४ यांना प्रतिवादी क्र. ४अ ते ४क हे वारस आहेत. सबब त्यांची वारस म्हणुन नोंद घेण्यात यावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, सदरचा दावा हा मयताविरुध्द दाखल करण्यात आलेला आहे, त्यामुळे दावा चालण्यासारखा नाही. सदरचा दावा हा जाणून बुजून मयता विरुध्द दाखल केलेला आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा हक्कप्रस्थापना होऊन मिळणेसाठी व कायम ताकिदीकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ४ हे मयत झाल्याने त्यांना प्रतिवादी क्र. ४अ. ओमकार सुभाष रजपूत, प्रतिवादी क्र. ४ब. कविता गजेंद्र पांढरे, प्रतिवादी क्र. ४क. श्रध्दा सुभाष रजपूत हे कायदेशीर वारस आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *"दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास*

*अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते."*

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. ४ सुभाष गोविंद रजपूत हे दिनांक १०/११/२०२३ मयत झाले आहेत. प्रस्तुतचा दावा, हक्कस्थापना व कायम ताकिदीकरीता दाखल केला असल्याने प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र. ४ यांचे वारस रेकॉडवर दाखल करणेस झालेला विलंब नि. ३८ कडील अर्जावरील आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. तसेच प्रतिवादी क्र. ४ विरुध्द 'दावा उपशमित' झालेबाबतचा आदेश नि. ३९ कडील आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ४ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात व दावा रजिस्टमध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.




Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2025.05.07 18:00:48 +0530

दिनांक– ०७/०५/२०२५ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, कुडाळ